# मराठी युवकभारती

वेळ: 3 तास

जुलै - 2016

एकूण गुण : 80

**प्र.१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर किमान ३०० शब्दांत निबंध लिहा:** (१०)

(१) स्वागत करू या मुलीच्या जन्माचे!

(२) पावसाळ्यातील एक दिवस

(३) सूर्य उगवला नाही, तर ........

(४) नापास झालेल्या विद्यार्थ्याचे आत्मकथन

**प्र.२. (अ) खालील काव्यवेच्याचे रसग्रहण करा:** (६)

**माणसा, समर्थ तू**

हस्ति सर्व संपदा, मस्तकात शारदा
असे असून दीनसा, झुरसी काय व्यर्थ तू
माणसा समर्थ तू

वळवशील तू नद्या, नमविशील डोंगरा
अडविशील सागरा, जिंकशील अंबरा
अदम्य आत्मशक्ति ही, विसरसी किमर्थ तू
आत्मनिष्ठ होऊनी, रहा करीत काम तू
उगवतील माणके, गाळताच घाम तू
हातपाय गाळूनी, निमंत्रिशी अनर्थ तू
भाळी हात लाविसी, विसरुनी स्वभाव तू
कार्य जे उभे पुढे, तयास हात लाव तू
पंगु देव, त्यासवे मांड मांड शर्थ तू
चाल, टाक पाऊले, उचल उभय हात तू
भ्यावयास जन्मसी, काय रे जगात तू
हृदयी कृष्ण बोलतो, रणांगणात पार्थ तू
माणसा समर्थ तू

**– कवी : ग. दि. माडगूळकर**

**किंवा**

**(१) खालीलपैकी कोणत्याही एका विषयाशी निगडित सुमारे १५ ते २० ओळींत संवादलेखन करा:**

(१) 'ओल्या कचऱ्याचे निर्मूलन' याबाबत आरोग्याधिकाऱ्यांशी संवाद.

(२) 'अभ्यासाचे नियोजन' कसे करावे, याबाबत मित्राशी संवाद.

**(२) भाजी मंडईतील भाजीविक्रेतीशी संवाद.**

**(ब) खालील प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा:** (४)

**(१) खालील नामासाठी योग्य ते विशेषण ओळखा:**

**माती :** *(अ) दमदार* *(ब) कसदार* *(क) मजेदार* *(ड) बहारदार*

**(२) खालील शब्दाला समानार्थी शब्द कोणता ते शोधा:**

**घोडा :** *(अ) अश्विनी* *(ब) गाडी* *(क) तुरग* *(ड) वराह*

**(३) गटात न बसणारा शब्द ओळखा:**

**(अ) ढग :** *(अ) वात* *(ब) जलद* *(क) मेघ* *(ड) घन*

**(ब) माननीय :** *(अ) वंदनीय* *(ब) शोचनीय* *(क) आदरणीय* *(ड) सन्माननीय*

**प्र.३. खालील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय ओळखून लिहा:**

**(अ) खालील पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखा:** (२)

(१) (य) कोट्याधीश (र) कोट्यधीश (ल) कोट्यधीष (व) कोट्याधिश

(२) (य) विसंगती (र) विसंगति (ल) वीसंगती (व) विसगंती

**(ब) खालील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा:** (२)

**(१) वाडेकोडे बोलणे -**

*(य) रागाने बोलणे (र) अद्वातद्वा बोलणे (ल) भरभर बोलणे (व) लडिवाळपणे बोलणे*

**(२) पोटात गोळा येणे -**

*(य) पोटात दुखणे (र) भीती दाटून येणे (ल) पोट फुगणे (व) पोटात गाठ येणे*

**(क) (१) खालील वाक्याचे प्रश्नार्थी रूपांतर ओळखा:** (१)

**वाक्य :** अहाहा! स्वाती आज प्रवासाहून घरी येणार!

**पर्याय** : (य) स्वाती आज प्रवासाहून घरी आल्याशिवाय राहणार नाही.
(र) स्वाती आज प्रवासाहून घरी आल्याशिवाय राहणार आहे का ?
(ल) स्वाती आज प्रवासाहून घरी येणार आहे.

**(२) खालील वाक्याचे नकारार्थी रूपांतर ओळखा :** (१)

**वाक्य** : प्राचीन भारत हा ज्ञानाने समृद्ध असा होता.

**पर्याय** - (य) प्राचीन भारत हा ज्ञानाने असमृद्ध होता का ?
(र) प्राचीन भारत होता ज्ञानाने समृद्धच!
(ल) प्राचीन भारत हा ज्ञानाने असमृद्ध असा नव्हता.

**(ड) खालील वाक्यांत कोणती विरामचिन्हे वापरता येतील, तो पर्याय निवडा :** (२)

(१) **वाक्य** : मनात विचार आला संपलं सगळं
(य) अर्धविराम, प्रश्नचिन्ह (र) स्वल्पविराम, उद्गारवाचकचिन्ह
(ल) अपसारणचिन्ह, उद्गारवाचकचिन्ह (व) स्वल्पविराम, अपूर्णविराम

(२) **वाक्य** : काय झालं की बाबुरावांना नातू झाला

**पर्याय** - (य) स्वल्पविराम, पूर्णविराम (र) अपूर्णविराम, उद्गारवाचकचिन्ह
(ल) उद्गारवाचकचिन्ह, प्रश्नचिन्ह (व) स्वल्पविराम, उद्गारवाचकचिन्ह

**(इ) खालील विधानांत / काव्यपंक्तींत कोणता रस प्रामुख्याने आढळतो, त्यासाठी योग्य पर्याय निवडा :** (२)

(१) “मला ते दगड-धोंड्यातून चालवीत नेत होते. पण माझ्यात कण्हण्याचीही ताकद नव्हती.”
(य) अद्‌भुत (र) करुण (ल) वीर (व) भयानक

(२) असे तुझ्याशी बोलावे हे
ठरवुन आलो मनात काही;
आणिक तुझिया नेत्री दिसले
बोलायाचे तसे तुलाही.
(य) करुण (र) अद्‌भुत (ल) शांत (व) शृंगार

**(फ) खालील पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा :** (२)

(१) **Bureaucracy** : (य) नोकरशाही (र) लोकशाही (ल) हुकुमशाही (व) बेबंदशाही

(२) **Motto** : (य) घोषवाक्य (र) मिश्रवाक्य (ल) ब्रीदवाक्य (व) संयुक्तवाक्य

**प्र.४. (अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा :** (४)

(१) ‘विडंबन’ ह्या विनोद प्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.
(२) तुकारामाने सांगितलेली सोनाराकडे येणाऱ्या भुताची गोष्ट तुमच्या भाषेत थोडक्यात लिहा.
(३) परीक्षेत वीज जाण्याची शक्यता असल्यामुळे मानसीकडून कोणकोणते सराव करवून घेतले गेले ?

**(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ‘एका’ वाक्यात लिहा :** (३)

(१) गूढोक्ती केव्हा निर्माण होते ? (२) धोतऱ्याने आपल्या लल्लाटी काय लावले ?
(३) रश्मीच्या सासूबाईंचे वय किती होते ? (४) चाफा कसली खंत करीत होता ?
(५) भुतांच्या दृष्टीने अगदी गैरसोईचे ठिकाण कोणते ?

**प्र.५. (अ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा :** (८)

(१) ‘मुंबईकर कामगारांचं अवघं लक्ष त्यांच्या कोकणातल्या खेड्याकडे असतं’, हे विधान स्पष्ट करा.
(२) लेखिकेला हिराच्या वैभवाचा हेवा का वाटला ?
(३) सूनबाईंनी यंत्रमानवबद्दल सासऱ्यांकडे कोणत्या तक्रारी केल्या ?
(४) लेखक आपले घर भाड्याने द्यायला का तयार झाले ?

(ब) **खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा:** (४)

(१) नंदनवनाचा आकार केवढा असतो?

(२) डॉ. कलाम तरुणांना का भेटतात?

(३) मुरुड हे ठिकाण कोकणातील कोणत्या जिल्ह्यात आहे?

(४) लेखक पुलाखालून वाहत जातांना कोणत्या नदीत पोहोचणार होते?

(५) 'ए मेरे वतन के लोगों' हे गीत कोणी गायिले आहे?

(६) बाबुराव हे कोणत्या कंपनीशी संबंधित होते?

प्र.६. (अ) **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा:** (८)

(१) संत नामदेवांचा प्रपंचाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा व्यक्त झाला आहे?

(२) कवयित्रीने देवाला 'अजब गारोडी' असे का म्हटले आहे?

(३) कामगाराच्या जीवनातील सहचारिणीचे अस्तित्व कवी नारायण सुर्वे यांनी कसे व्यक्त केले आहे?

(४) 'आपण आपले एक छोटे नगर वसवू' असे कवी लोकनाथ यशवंत का म्हणतात?

(ब) **खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा:** (३)

(१) मायमातीच्या लेकरांची झुंज कशासाठी आहे?

(२) महात्मा फुले यांचे संपूर्ण नाव लिहा.

(३) जात्याचे दोन खुंटे कोणते आहेत?

(४) स्वातंत्र्याचे डंके कोणत्या पथावर झडले?

(५) घरातील स्त्रीला कोण कोण साद घालते?

प्र.७. (अ) **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा:** (८)

(१) अग्रलेख आणि बातमी यांतील फरक स्पष्ट करा.

(२) आकाशवाणीवरील बातमी लिहिताना कोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो?

(३) दूरचित्रवाणीवरील जाहिरात लेखनात आवश्यक असणारे घटक कोणते?

(४) महाजालावर एखादे संकेतस्थळ सुरू करण्यासाठी कोणकोणती पूर्वतयारी करावी लागते?

(ब) **खालीलपैकी कोणत्याही सहा प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा:** (६)

(१) वृत्तपत्रीय लेख म्हणजे काय?

(२) आकाशवाणीचे ब्रीदवाक्य लिहा.

(३) भारतात दूरचित्रवाणीसाठी पहिला प्रक्षेपक कोणत्या कंपनीने बनविला?

(४) 'सोशल नेटवर्किंग' साठी मराठीतील संज्ञा लिहा.

(५) 'धावपळीचे साहित्य' म्हणून कोणत्या लेखनाचा उल्लेख केला जातो?

(६) आकाशवाणीवरील प्रसारणात उद्घोषणा केव्हा दिली जाते?

(७) जाहिरातकलेमध्ये लक्ष्यस्थानी कोण असते?

(८) संकेतस्थळ तयार करण्यासाठी कोणती प्रमाणित भाषा वापरतात?

(९) वृत्तपत्रातील सर्वात महत्त्वाचा संपादकीय लेख कोणता?

(क) **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर मुलाखतपूर्व तयारी म्हणून प्रश्नावली तयार करा:** (४)

(१) राज्यस्तरीय वक्तृत्वस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याची / विद्यार्थिनीची मुलाखत.

(२) तुमच्या परिसरातील एका रक्तदात्याची मुलाखत.

(३) वृक्षमित्र समितीच्या अध्यक्षाची मुलाखत.

❖ ❖ ❖